महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

नवी मुंबई पोलीस

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# नवी मुंबई पोलीस आयुक्तालय अंतर्गत
# पोलीस कल्याण शाखा
# माहिती पुस्तिका



सत्यमेव जयते

महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

नवी मुंबई पोलीस

Navi Mumbai Police

# नवी मुंबई पोलीस

महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

नवी मुंबई पोलीस

Navi Mumbai Police

# सदैव तत्पर, सदैव मदतीस


नवी मुंबई पोलीस
NAVI MUMBAI POLICE
नवी मुंबई पोलीस
NAVI MUMBAI POLICE

## मनोगत



नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील सर्व पोलीस अधिकारी व अमलदार यांचे सेवांतर्गत मिळणारे लाभ, त्यांचे अडीअडचणी सोडविणे तसेच विविध कल्याणकारी योजना नवी मुंबई पोलीस आयुक्तालयामार्फत राबविण्यात येत आहेत.

नवी मुंबई पोलीस कल्याण निधी मार्फत सर्व पोलीस अधिकारी व अमलदार यांचेकरीता विविध कल्याणकारी योजना राबविल्या जात असून त्यामध्ये मुख्यत्वे आरोग्यविषयक बाबी. महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजना, गुणवंत पोलीस पाल्यांना पुस्तक अनुदान, शिष्यवृत्ती, वैदयकिय अग्रीम, शैक्षणिक अग्रीम एकलव्य व विकास कौशल्य योजना, वैदयकीय शिबीर अशा विविध कल्याणकारी योजना पोलीस कल्याण शाखेमार्फत राबविल्या जात आहे. नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे पाल्याना विविध व्यावसायिक प्रशिक्षण देवुन त्यांना नोकरी / रोजगार याकरीता सक्षम करून त्यांना नोकरी / रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील पोलीस अधिकारी व अमलदार यांच्या प्रशासकीय प्रलंबित प्रकरणाची शिघ्रतेने निर्गती, कामकाजामध्ये पारदर्शकता व सुलभता याकरीता समाधान हेल्पलाईन / पीएफसी सेंटर सुरू करण्यात आले आहे. तसेच M-POLICE प्रणालीद्वारे बहुतांशी प्रशासकीय कामे ऑनलाईन पद्धतीने कागदविरहीत प्रक्रियेद्वारे करण्यात येत आहेत. नवी मुंबई पोलीस दलातील सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना त्यांचे दैनंदिनी कामकाज / कर्तव्य प्रभावीपणे करता यावे याकरीता त्यांची शारीरिक व मानसिक सक्षमीकरण व्हावे तसेच त्यांचे कुटूंबियांपर्यंत कल्याणकारी योजनांचा लाभ पोहचविण्यासाठी पोलीस कल्याण विभागामार्फत प्रयत्नरत आहोत.

**मिलींद भारंबे**

**पोलीस आयुक्त, नवी मुंबई**

मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयीन पत्र
जा. क्र. पोमसं/28. अे/4937/ पो.क.नि. नियमावली/ 149/ 2018 दि.19/04/2023 रोजीची सुधारीत
पोलीस कल्याण निधी नियमावलीनुसार

**नवी मुंबई पोलीस कल्याण निधी मार्फत राबविण्यात येणा-या योजना**

| अ.क्र | पोलीस कल्याण निधी मार्फत राबविण्यात येणा-या योजना |
|---|---|
| 1 | पोलीस कल्याण निधीतील वर्गणी |
| 2 | आरोग्यविषयक बाबींकरीता अनुदान |
| 3 | महिलांसाठी विशेष पोषण आहार व सुदृढ बालिका अनुदान |
| 4 | पुस्तक अनुदान |
| 5 | दप्तर (बस्ता) अनुदान (इ.5वी ते 10वी मधील फक्त मुलींना) |
| 6 | उच्च शिक्षणाकरिता विदयार्थ्यांना शिष्यवृत्ती |
| 7 | पदव्युत्तर पदवी संपादन करणा-या मुलींना विशेष शिष्यवृत्ती |
| 8 | शैक्षणिक अग्रीम (कर्ज) |
| 9 | एकलव्य योजना उद्योजकता व कौशल्य विकास योजना |
| 10 | अंत्यविधी अनुदान |
| 11 | सानुग्रह अनुदान |
| 12 | महाराष्ट्र दर्शन रजा प्रवास सवलत प्रवास करणा-या पोलीस अधिका-यांना/कर्मचा-यांना अनुदान |
| 13 | कला, साहित्य, क्रिडा व खेळ यासाठी मानधन |
| 14 | शिवणयंत्र |
| 15 | सुसंघटित लघुउदयोग व तत्सम प्रकल्प |
| 16 | निराश्रित सेवानिवृत्त पोलीस अंमलदारांना ठोक रक्कम |
| 17 | प्रवास भत्ता (कर्ज) |
| 18 | वैदयकीय अग्रीम (कर्ज) |
| 19 | वैदयकीय अग्रीम क्षमापित तरतुद |
| 20 | महाराष्ट्र  पोलीस कुटुंब आरोग्य योजना |
| 21 | सबसिडिअरी पोलीस कॅन्टीन, पोलीस मुख्यालय, कळंबोली नवी मुंबई |
| 22 | विसावा उपहारगृह, सीबीडी बेलापूर, पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई |
| 23 | पोलीस पाल्यांचे लग्नकार्याकरिता मुख्यालय, कळंबोली येथील बहुउद्देषिय हॉल व पोलीस बॅण्ड विशेष सवलतीच्या दरात उपलब्ध करुन देणे |
| 24 | पोलीस आयुक्तालयातील पोलीस अधिकारी यांचेकरीता व्यायामशाळा |
| 25 | पोलीस मुख्यालयातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांचेकरीता व्यायामशाळा |
| 26 | पोलीस मुख्यालय येथे पोलीस अधिकारी यांचेकरीता रेस्ट हाउस |

# पोलीस कल्याण निधीचा विनीयोग

**१) पोलीस कल्याण निधीतील वर्गणी**

पोलीस कल्याण निधीच्या सदस्यांकडून चौमाहीवर्गणीच्या रक्कमेचे कालावधीनिहाय एप्रिल २०२३ पासून आकारण्यात येणारे दर खालीलप्रमाणे असून सदरची रक्कम माहे एप्रिल, ऑगस्ट व डिसेंबर च्या वेतनातून कपात करण्यात येते..

**२) आरोग्याविषयक बाबींकरीता अनुदान**

वैद्यकीय बाबींकरीता शासकीय रुग्णालयातून सुविधा पुरविल्या जात नाहीत त्याकरीता पोलीस कल्याण निधीच्या सभासदास फक्त एकदाच संबंधित घटक पोलीस कल्याण निधीतून ५०००/- (रु. पाच हजार फक्त) अनुदान म्हणून मंजूर करण्यात येते.

१) जी औषधे पुरविली जात नाहीत, अशी विशेष औषधे, औषधीद्रव्ये इत्यादी..
२) अर्धांगवायु, पोलीओ, कर्करोग, इत्यादीसारख्या विशिष्ट वर्गातील रोग बरे होण्याकरीता लागतील, अशी इतर उपयंत्र किंवा उपकरण संच,
३) शासकीय कर्मचाऱ्यांना द्यावयाच्या वैदयकीय उपचारासाठींच्या त्यावेळी अंमलात असलेल्या नियमानुसार ज्यांच्या खर्चाची प्रतिपुर्ती केली जात नाही अशी श्रवणयंत्रे, कवळी व कृत्रीम अवयव त्यादी सारखी उपयंत्रे (संदर्भ :- परिपत्रक क्र. पोमसं/ २८- ओ / ४९३७ /मपोकनिस बैठक अनु. / ३९/२००५, दि. २७/०२/२०१३)

**3) महिलांसाठी विशेष पोषण आहार व सुदृढ बालिका अनुदान**

पोलीस कल्याण निधीचे सभासद असलेल्या महिला पोलीस अंमलदार ते महिला पोलीस निरीक्षक तसेच हिला लिपीक वर्गीय अधिकारी / कर्मचारी ते गट-ड च्या महिला कर्मचारी यांना पहिल्या प्रसुतीच्या काळात तीच्या व तीच्या होणा-या बाळाच्या आरोग्याचा दर्जा वाढविण्याच्या हेतुने पोलीस कल्याण निधीतून रक्कम रु.५०००/- (रु. पाच हजार फक्त) इतके " विशेष पोषण आहार अनुदान" देण्यात येईल. तसेच जन्मास आलेले अपत्य हे मुलगी असल्यास बेटी बचावच्या पार्श्वभूमीवर व मुलीचा जन्मदर वाढण्यास प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने तीच्या पोषणासाठी देखील वरील अनुदानाव्यतीरिक्त रु.५०००/- (रु. पाच हजार फक्त) "सुदृढ बालिका अनुदान" देण्यात येईल.


### ४) पुस्तक

पोलीस कल्याण निधीचे सभासद असलेले पोलीस अमलदार ते पोलीस निरीक्षक तसेच लिपीक वर्गीय अधिकारी / कर्मचारी ते गट-ड चे कर्मचारी यांचे २ मुला-मुलींना पुस्तक अनुदान दिले जाईल. राज्यातील विविध नक्षलवादी / अतिरेकी हल्ल्यातील शहिद पोलीस अधिकारी / अंमलदार यांची २ मुला-मुलींना पुस्तक अनुदान दिले जाईल.
राज्य पोलीस विभागात सेवेत असतांना कोणत्याही दिवंगत झालेल्या पोलीस अधिकारी / अंमलदारांच्या २ पाल्यांना त्यांच्या नियत वयोमानानूसार सेवानिवृत्ती दिनांकापर्यंत पदवी / इयत्ता १२ वी फक्त ३ वर्षापर्यंतच्या कोणत्याही अभ्यासक्रमासाठी पुस्तक अनुदान दिले जाईल.
मात्र पुस्तक अनुदान मंजूरीसाठी गुणपत्रकाची साक्षांकित प्रत निकालाच्या तीन महिन्याच्या आत सादर करणे आवश्यक राहील.

### ५) दप्तर (बस्ता) अनुदान

सर्व पोलीस घटकांतील पोलीस अंमलदार ते सहायक पोलीस उपनिरीक्षक दर्जाच्या पोलीस अंमलदारांच्या तसेच लिपिक वर्गीय (कनिष्ठ श्रेणी लिपिक ते प्रमुख लिपिक) ते वर्ग-४ कर्मचा-यांच्या इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंतचे शिक्षण घेत असलेल्या पोलीस अंमलदाराच्या २ मुलींना प्रत्येकी रु.१०००/- वार्षिक या दराने शैक्षणिक प्रोत्साहन म्हणून दप्तर अनुदान देण्यात येईल.

| अनु क्र | शैक्षणिक अभ्यासक्रम | टक्केवारी | पुस्तक अनुदानाचे दर २०२२-२३ पासून |
|---|---|---|---|
| १ | इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंत | ८५% किंवा प्रमुख ६ विषयांपैकी ३ विषयामध्ये किमान अ-२ श्रेणी | १३७५ |
| 2 | इयत्ता ११ वी व १२ वी | ८५.००% | २७५०/ |
| 3 | वरिष्ठ महाविद्यालयात पोस्ट ग्रॅजुएट D.Ed, B.Ed, BSc Agri, BCA, MCA, MSW, Diploma in farmacy, Hotel Management.) | ७०.००% | ४१२५/- |
| 4 | अभियांत्रिकी पदविका Diploma | ६५ | ४१२५/- |
| ५ | वैद्यकीय पदविका Diploma D. Pharm | ६५ | ४१२५/- |
| 6 | अभियांत्रिकी पदवी (डिग्री) बी. ई पदव्युत्तर पदवी (एम ई ) | ६५ | ९६२५/- |
| ७ | आरोग्य / पशुवैद्यकीय पदवी / बी-फार्म / एम फार्म डिग्री. पदव्युत्तर पदवी | ६५ | 19800 |



### ६) उच्च शिक्षणाकरीता "शिष्यवृत्ती अनुदान"   (स्कॉलरशिप)

पोलीस अंमलदार ते पोलीस निरीक्षक तसेच पोलीस कल्याण निधीचे सभासद असलेले लिपिक वर्गीय अधिकारी / कर्मचारी ते गट-ड चे कर्मचारी यांच्या दोन पाल्यांना उच्च शिक्षण घेण्यास प्रोत्साहन मिळावे म्हणून खालील नमूदप्रमाणे शिष्यवृत्ती अनुदान देण्यात येईल.

१) भारतीय अभियांत्रिकी संस्था (IIT), भारतातील कोणतेही वैद्यकीय महाविद्यालय (MBBS) जेथे सामायीक प्रवेश परिक्षेद्वारे प्रथम प्रवेश घेतलेल्या पाल्यास रु.१,००,००० /- (रुपये एक लाख मात्र) इतकी रक्कम शिष्यवृत्ती अनुदान म्हणून देण्यात येईल. सदर रु.१,००,०००/- (रुपये एक लाख मात्र) अनुदानापैकी रु.५०,०००/- (रुपये पन्नास हजार मात्र) इतकी रक्कम धनादेशाद्वारे प्रथमवर्षी व उर्वरित रु. ५०,००० /- (रुपये पन्नास हजार मात्र) इतकी रक्कम धनादेशाद्वारे दुस-या वर्षी संबंधित अधिकारी / अंमलदार यांना देण्यात येईल.

२) भारतीय प्रबंधक संस्था (IIM), सर्व नॅशनल लॉ स्कुल्स व सर्व राष्ट्रीय अभियांत्रिकी संस्था (NIT) सामायीक प्रवेश परिक्षेद्वारे प्रथम प्रवेश घेतला आहे असे भारतातील कोणतेही दंत महाविद्यालय (BDS) या शिक्षण संस्थांमध्ये प्रथम प्रवेश घेतलेल्या पाल्यास रु.२५,०००/- (पंचवीस हजार मात्र) शिष्यवृत्ती अनुदान देण्यात येईल.

३) वैद्यकीय (MD, MS), अभियांत्रिकी (ME, M.Tech.), विधी अभ्यासक्रम (LLM), व्यवसाय व्यवस्थापन (MBA, CA, CS, Cost Accountancy (from ICWA), MCA.) यापैकी कोणत्याही शासन मान्य शिक्षण संस्थेतून पूर्ण केलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या यशस्वी पूर्ततेनंतर रु.२५,०००/- (पंचवीस हजार मात्र) विशेष शिष्यवृत्ती अनुदान देण्यात येईल.



## ७) शैक्षणिक अग्रिम

पोलीस अंमलदार ते पोलीस निरीक्षक तसेच पोलीस कल्याण निधीचे सभासद असलेले लिपिक वर्गीय अधिकारी / कर्मचारी ते गट-ड चे कर्मचारी यांच्या दोन पाल्यांकरिता नियम (ब) (२) मध्ये नमूद केलेल्या शिक्षण संस्थांसह बी. टेक / बी. ए. एम. एस. / बी. एच. एम. एस / इतर मॅनेजमेंट कॉलेज, बी. सी. ए. / एम. सी. ए. अशाप्रकारचे व त्या समकक्ष इतर महत्वाचे शिक्षण घेत असलेल्या शासनमान्य अभियांत्रिकी / वैद्यकीय तसेच प्रबंध संस्थांमध्ये आणि शासनमान्य व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी कर्जस्वरुपात शिक्षणासाठी वार्षिक टयुशन फी स्वरुपात भराव्या लागणा-या फी एवढी रक्कम रु. ७५,००० /- (रुपये पंचाहत्तर हजार मात्र) शैक्षणिक अग्रिम म्हणून देण्यात येईल. सदरहू शैक्षणिक अग्रिम वार्षिक कमाल मर्यादेत, १२ हप्त्यांमध्ये परतफेड करण्याच्या अटीवर देण्यात येईल. कर्ज स्वरुपात घेतलेल्या रकमेची परतफेड केल्यानंतर संबंधित पाल्याने त्या कोर्समध्ये गुणवत्ता प्राप्त केल्यास (शैक्षणिक सत्रात ६० टक्के पेक्षा जास्त गुण मिळवल्यास व पाल्यांना आवश्यकता भासल्यास) परत रु. ७५,०००/- (रुपये पंचाहत्तर हजार मात्र) शैक्षणिक अग्रिम म्हणून (त्याच अटींवर) देण्यास पात्र राहतील..






## ८) एकलव्य योजना - उद्योजकता व कौशल्य विकास योजना

महाराष्ट्र पोलीस दलातील पोलीस अंमलदार ते सहायक पोलीस उपनिरीक्षक तसेच लिपिक वर्गीय (कनिष्ठ श्रेणी लिपिक ते प्रमुख लिपिक) ते वर्ग-४ कर्मचा-यांच्या पती/पत्नीला व त्यांचे १८ वर्षावरील पाल्यांना नवीन लघुउद्योग सुरु करण्यासाठी अग्रीम तत्वावर परतफेडीच्या अटीवर कमाल बिनव्याजी रु.१,००,०००/- (रुपये एक लाख इतके) अग्रीम भांडवल देण्यात येते. अग्रीम मंजुर झाल्यानंतर पुढील ६ महिन्याच्यानंतर म्हणजेच ७ व्या महिन्यापासुन १८ मासिक हफ्त्यात अग्रीमाची वसुली करण्यात येईल. - या योजनेकरीता वितरीत करावायाचा निधी प्रथमतः घटक पोलीस कल्याण निधीमधून वितरित केला जाईल व त्याची प्रतिपूर्ती घटक प्रमुखांनी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयास अहवाल पाठविल्यानंतर मध्यवर्ती पोलीस कल्याण निधीमधून घटक कल्याण निधीमध्ये केली जाईल. सदर योजनाचा लाभ मंजुर झाल्यानंतर तीन महिन्याच्या आत लघु उदयोग सुरू न केल्यास किंवा योजनेचा गैरवापर केल्यास संबंधित पोलीस अंमलदाराकडुन वार्षिक १२ टक्के व्याजाने सर्व रक्कम चार मासिक हफ्त्यात वसुल केली जाईल. भाजीविक्रीचे दुकान, शिलाई व्यवसाय, किरकोळ वस्तु विक्रीचा व्यवसाय, पेपर विकी, पर्यटन अभिकर्ता, झेरॉक्स व अन्य उद्योग याकरीता अग्रीम मंजुर करण्यात येईल.





## ९) अंत्यविधी अनुदान

पोलीस कल्याण निधीचे सभासद असलेल्या परंतु पोलीस विभागात सेवेत असतांना मृत पावलेल्या सर्व अधिकारी / अंमलदार यांच्या पत्नी / पतीला / जवळच्या नातलगाला अंत्यविधीचा खर्च भागविण्यासाठी रु. २०,०००/- इतक्या रक्कमेचे अंत्यविधी अनुदान आणि त्यांच्या मुळ गावी शव पोहचविण्यासाठी पोलीस वाहनांचा उपयोग केला असल्यास, त्या वाहनासाठी केलेल्या पेट्रोलच्या व इतर सर्व खर्चाची रक्कम देण्यात येईल.



## १०) सानुग्रह अनुदान

सेवेत असतांना, आपले कर्तव्य बजावत असतांना किंवा अन्यथा मरण पावलेल्या पोलीस निरीक्षक व त्याखालील दर्जाच्या पोलीस अधिकारी / अंमलदार यांच्या कुटूंबियांना शासनाकडून सानुग्रह अनुदान खालील विवरणपत्रात दर्शविलेल्या दरांप्रमाणे सानुग्रह अनुदान दि. ३०/०७/२०१२ पासून दिले जाईल.

| अनु क्र | पदनाम | सानुग्रह अनुदान (रु) | १९ वर्षाखालील ३ मुलांपर्यंत प्रत्येकी सानुग्रह अनुदान (रु) |
|---|---|---|---|
| १ | पो. नि. स. पो. नि. | ३०,०००/- | ३०,०००/- |
| 2 | पो.उप.नि. | २५,०००/- | २५,०००/- |
| 3 | स. पो.उप.नि. | २०,०००/- | २०,०००/- |
| 4 | पो. अंमलदार ते पो. हवा. | २०,०००/- | २०,०००/- |
| ५ | कर्तव्य बजावताना मृत्यू आल्यास (पो. नि. ते. पो. अमलदार) | ५०,०००/- | ५०,०००/- |

## ११) महाराष्ट्र दर्शन रजा प्रवास सवलत अनुदान

पोलीस अंमलदार ते सहायक पोलीस उपनिरीक्षक दर्जाच्या पोलीस अंमलदाराच्या तसेच पोलीस कल्याण निधीचे सभासद असलेले कनिष्ठ श्रेणी लिपिक ते प्रमुख लिपिक व वर्ग-ड चे कर्मचारी, यापैकी मंजूर रजा कालावधीत जे कर्मचारी महाराष्ट्र दर्शन रजा प्रवास सवलत घेतात त्यांना घटक पोलीस कल्याण निधीतून प्रत्येकी रु. १०००/- (रुपये एक हजार मात्र) एक रकमी अनुदान म्हणून देण्यात येईल.

## १२) कला, साहित्य, क्रिडा व खेळ यासाठी मानधन

पोलीस कल्याण निधीच्या सदस्यांना व त्यांच्या पाल्यांना घटक पोलीस कल्याण निधीतून क्रिडा साहित्य उपलब्ध करून देता येईल. तसेच निधीच्या सदस्यांना कला, साहित्य, क्रिडा व खेळ यासाठी प्रोत्साहन व उत्तेजन या प्रयोजनास्तव, संबंधित घटक पोलीस कल्याण निधीमधुन संबंधित घटकांच्या गरजेनुसार व उपलब्धेनुसार खालील बाबींकरीता निधी उपलब्ध करून देता येईल.

१) क्रिडा व खेळाचे साहित्य खरेदी करण्यासाठी, खास शिक्षक, प्रशिक्षक व इतर क्रिडा अधिकारी / अंमलदार यांना मानधन देण्यासाठी, युनिट, परिक्षेत्र व राज्य पातळीवर पोलीस क्रिडा व खेळ आयोजीत करण्यासाठी.

२) कला, साहित्य, क्रिडा व खेळ यात भाग घेण्यास चमू (महाराष्ट्रात, महाराष्ट्राबाहेर किंवा देशाबाहेर) पाठविण्यासाठी.

३) परंतु जिल्हा / राज्य / राष्ट्रीय/आंतराष्ट्रीय पातळीवर कला, साहित्य, क्रिडा व खेळ आयोजीत करणे किंवा घटकांच्या अधिकारक्षेत्राबाहेरील खेळात भाग घेण्यासाठी चमू/खेळाडु देशांतर्गत किंवा देशाबाहेर पाठविणे हया गोष्टी पोलीस महासंचालक यांच्या पुर्व मान्यतेशिवाय करता येणार नाहीत...



### १३) शिवण यंत्र

पोलीस कल्याण निधीच्या सदस्यांना शिवणयंत्रे खरेदी करण्यासाठी किंवा त्यांचे उत्पन्न वाढविण्याकरीता किफायतशीर उपक्रम सुरू करण्यासाठी कर्ज देणे, परंतु जे उपक्रम शासकीय अंमलदाराच्या सध्याच्या वर्तणुक नियमावली अन्वये अनुज्ञेय असले पाहिजे.





### १४) सुसंघटित लघुउदयोग व तत्सम प्रकल्प

पोलीस कल्याण निधीच्या सदस्यांचे कुटूंबिय व इतर यांना नोकरी करता येईल, असे सुसंघटित लघुउद्योग व तत्सम प्रकल्प घटक मुख्यालयाच्या व इतर ठिकाणी सुरू करता येतील. परंतु त्याबाबत खालील नमुद बाबींची काळजी घ्यावी.

१) निधीतुन चालु करण्यात आलेल्या उपक्रमाच्या बाबतीत ते योग्य तऱ्हेने पार पाडण्यात यावेत.

२) त्यांचा हिशेब अंतर्गत व बाहेरील लेखा परिक्षकांकडुन तपासण्यात यावा.

३) खर्च, घसारा इत्यादीसाठी तरतुद केल्यानंतर अशा उपक्रमातुन होणारा नफा निधीमध्ये जमा करण्यात यावा.



## १५) निराश्रित सेवानिवृत्त पोलीस अंमलदारांना ठोक रक्कम

अनेक सेवानिवृत्त पोलीस अंमलदारांना मुले नसतात किंवा जवळचे नातेवाईक नसतात आणि त्यामुळे त्यांनी फक्त निवृत्तीवेतनावर आणि सेवानिवृत्तीनंतर मिळणा-या इतर निवृत्ती वेतन लाभावर अवलंबून रहावे लागते. त्यापैकी काही जणांकडे त्यांचा वार्धक्यात कोणतेही उत्पन्नाचे साधन नसते आणि त्यामुळे औषधे ईत्यादिंचा खर्च करणे व तो भागविणे फारच कठीण जाते. म्हणून लायक व अन्यथा निराश्रित असतील, अशा सेवानिवृत्त पोलीसांना त्यांच्या घटक पोलीस कल्याण निधीतून अधिकतम रु.५,०००/- (रुपये पाच हजार मात्र) पर्यंतची ठोक रक्कम घटक प्रमुख देऊ शकतात. तथापि, ही रक्कम प्रत्येकांच्या बाबतीत फक्त एकदाच देण्यात येईल.

## १६) प्रवास अगोदर

कर्तव्यासाठी म्हणून ब-याच मोठ्या संख्येने पोलीस अंमलदारांना तात्काळ बाहेर पाठविणे भाग असते आणि जेव्हा कोषागारातून किंवा स्थायी अग्रिमातून प्रवासभत्ता अग्रिम देणे शक्य नसते, अशा अत्यंत निकडीच्या प्रसंगी निधीतून देता येईल. तथापि कोषागारातून प्रवासखर्च अग्रिम काढल्यानंतर लगेच त्यांची प्रतिपूर्ती केली जाईल, असे अग्रिम अपवाद म्हणून दिले जाईल. नियम म्हणून नाही.





## १७) वैद्यकीय अग्रिम

क्षयरोग, कर्करोग, पोलिओ, अर्धांगवायू, पक्षाघात, फुफ्फुस / हृदयविकार / मेंदू / किडणीशी संबंधित आजार, एचआयव्ही पॉझीटीव्ह, कॉक्लीयर इम्प्लांट व इतर सर्व भविष्यातील संभाव्य अज्ञात गंभीर आजार झालेल्या पोलीस कल्याण निर्धीच्या सदस्यांना (पोलीस अधिकारी / अंमलदार यांचे बाबतीत शासन मान्य महाराष्ट्र पोलीस कुटूंब आरोग्य योजनेमध्ये अंतर्भूत नसलेले सर्व गंभीर आजार), पोलीस कल्याण निधी नियमातील वित्तीय प्राधिकारानुसार खालील अटींवर अग्रिम देता येईल.

१) एक अग्रिम / कर्जाची पूर्णपणे परतफेड झाल्याशिवाय दुसरा अग्रिम / कर्ज
देता येणार नाही.

२) वैद्यकीय प्रतिपूर्ती बिले पास होताच, अशी अग्रिमे संपूर्णतः वसूल केली जातील. मात्र कोणत्याही कारणास्तव प्रतिपूर्तीद्वारे विहित कालावधीत परतफेड न झाल्यास संबंधित अग्रिमधारकांच्या वेतनातून अग्रिम रक्कम व्याजासह वसूल केली जाईल.

३) आत्यंतिक अनुकंपा म्हणून एखादया सदस्याला घटक निधी प्रशासक हे त्यांच्या वित्तीय प्राधिकारानूसार अग्रिम मंजूर करु शकेल.


४) सदरचे अग्रिम १८ महिन्यांपर्यंत बिनव्याजी असेल. तसेच अग्रिमाची वसूली अग्रीम मंजूरीच्या ३ महिन्यानंतर संबंधित अग्रिम धारकाच्या वेतनातून कपात करण्यास सुरुवात करावी. त्यानंतरच्या कालावधीत परतफेड करावयाच्या कर्जाच्या रकमेवर द.सा.द.शे. १० टक्के दराने व्याज आकारण्यात येईल.

## १८) वैद्यकीय अग्रिम क्षमापित तरतुद

पोलीस कल्याण निधीचा सदस्य असलेल्या पोलीस अधिकारी/अंमलदार/लिपिक वर्गीय अधिकारी / कर्मचारी व गट-ड चे कर्मचारी उपचार घेत असतांना मृत्यू पावल्यास त्या अधिकारी / कर्मचा-यास वैद्यकीय उपचाराकरिता पोलीस कल्याण निधीतून दिलेल्या वैद्यकीय अग्रिमाची रक्कम ज्यावेळी प्रतिपूर्तीनि प्राप्त केली जाईल, त्यावेळी दिलेले अग्रिम आणि प्रतिपूर्तीची रक्कम यामधील जी फरकाची रक्कम आहे ती रक्कम क्षमापित करण्यात येईल.

## १९) महाराष्ट्र पोलीस कुटूंब कल्याण योजना

महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजना सन २००५ पासुन राबविण्यात येत आहे. या योजने अंतर्गत लाभ घेण्यासाठी राज्य पोलीस दलातील सर्व प्रवर्गातील अधिकारी / अंमलदार यांच्यासह त्यांच्यावर अवलंबून असलेल्या महाराष्ट्र राज्य सेवा अधिनियम, १९६१ मधील नियम २ (३) मधील "कुटुंब" या संज्ञेअंतर्गत समाविष्ठ असणा-या व्यक्ती पात्र राहतील. या योजनेअंतर्गत पोलीस दलातील कोणत्याही प्रवर्गातील अधिकारी / अंमलदार रजेवर असल्यास किंवा त्यास निलंबित केले असल्यास तो व त्यांचे कुटुंबिय लाभ घेण्यास पात्र राहतील. या योजनेअंतर्गत सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील शासन निर्णय दि. १९/०३/२००५ अन्वये शासनाने निश्चित केलेल्या २७ आकस्मिक व ०५ गंभीर अशा एकुण ३२ आजारांवर आंतररुग्णालयीन औषधोपचार विनामुल्य देण्यात येतील. या योजने अंतर्गत पोलीस दलातील अधिकारी / अंमलदार व त्यांच्यावर अवलंबित व्यक्ती यांना विनामुल्य औषधोपचार दिले जातात. या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य व पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे कार्यक्षेत्र विचारात घेवुन त्रयस्थ पक्ष प्रशासक (THIRD PARTY ADMINISTRATOR)








नेमलेले आहेत. महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेअंतर्गत पात्र व्यक्तींना ३२ आजारांवर विनामुल्य औषधोपचार देणेबाबत निवडक खाजगी रुग्णालयाशी वेळोवेळी त्रिपक्षीय करार करण्यात आलेला आहे

**२०) सबसिडीअरी पोलीस कॅन्टीन, नवी मुंबई**

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील सर्व पोलीस अधिकारी / कर्मचारी, मंत्रालयीन स्टाफ तसेच सेवानिवृत्त झालेले अधिकारी / अंमलदार व त्यांचे कुटूंबियांकरीता पोलीस कल्याण निधीमार्फत सवलतीच्या दरात वस्तू व साहित्य मिळावे याकरीता सबसिडीअरी पोलीस कँटीन, पोलीस मुख्यालय, कळंबोली, नवी मुंबई येथे सुरू करण्यात आलेली आहे.



**२१) विसावा उपहारगृह**

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील पोलीस अधिकारी / कर्मचारी, मंत्रालयीन स्टाफ यांना अल्पोपहार व जेवणाकरीता सवलतीच्या दरात पोलीस आयुक्तालयात विसावा उपहारगृह सुरू करण्यात आले आहे..




**२२) बहुउद्देशिय हॉल**

मा. पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांचेकडील यांचेकडील जा.क्र. पोआ/ नमुं पशा / पो.क. नि/८६४९/२०१२,दि. १६/०८/२०१२ अन्वये पोलीस मुख्यालय, कळंबोली येथील बहुउद्देशिय हॉल भाडयाने देणेकामी दर खालील प्रमाणे निश्चित करण्यात आले आहेत.

१) पोलीसांचे मुला/मुलींच्या लग्न कार्य आदी. समारंभासाठी रक्कम रु.१२,५००/- (अक्षरी रक्कम रु. बारा हजार पाचशे माल)

२) तसेच इतरांसाठी रक्कम रु.५०,०००/- (अक्षरी रक्कम रु. पन्नास हजार मात्र )
तसेच सदर बहुउद्देशिय हॉल भाडेतत्वावर देतांना खालील अटी शर्तीचे अवलोकन करण्यात येते.

१) सदर दिवशी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवल्यास अथवा शासकीय कामासाठी बहुउद्देशिय हॉलची कार्यालयास आवश्यकता असल्यास आपणांस सदर हॉल उपलब्ध करुन दिला जाणार नाही.

२) बहुउद्देशिय हॉलचे भाडे शासन भरणा केल्यानंतर सदरची रक्कम परत मिळणार नाही.

३) बहुउद्देशिय हॉल मध्ये स्पीकर, मंडप, खुर्च्या उपलब्ध करून मिळणार नाहीत.



४) बहुउद्देशिय हॉलचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास त्याची भरपाई करुन देणे बंधनकारक राहील.

तसेच सदर बहुउद्देशिय हॉलची भाडयाची रक्कम मा. पोलीस महासंचालक, म. रा. मुंबई यांचेकडील पत्र क्र. पोमस / १६ब / ७३१५ / प्रलेआ सहा.वि/१८३/२०११, दि. ३० / ५ / २०१४ अन्वये मुख्य लेखाशिर्ष ००५५ (०१) (०५) सार्वजनिक व खाजगी संस्था यांच्याकडुन प्राप्त झालेली अंशदान भाडे (००५५ ०१७ ३) या लेखाशिर्षाखाली भरणा करण्यात येते.

## २३) पोलीस बॅण्ड

मा. पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांनी दि.०१/०४/२०१९ अन्वये ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाचे पोलीस बॅण्डचे दरानुसार नवी मुंबई आयुक्तालयाच्या पोलीस बॅण्डचे दर निश्चित करणेबाबत आदेशित केले होते. त्यानुसार राखीव पोलीस निरिक्षक, नवी मुंबई यांचेकडील जा. क. पोआ / नमु/ पोमुख्या/ १३९०/२०१९, दि. १९/०३/२०१९ मध्ये नमुद केले प्रमाणे खालील प्रमाणे दर निश्चित करण्यात आले आहेत.

| अ. क्र. | तासांचा तपशील | खाजगी व्यक्ती | शाळा कॉलेज | पोलीस अधिकारी | पोलीस अंमलदार | वाहन खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ तास | १५००० | 10000 | 5000 | 5000 | 1000 |
| | पढील तासाला | 2000 | 2000 | 1000 | 1000 | |

## २४) पोलीस आयुक्तालयातील पोलीस अधिकारी यांचेकरीता व्यायामशाळा

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयात पोलीस उप निरीक्षक व त्यावरील दर्जाचे अधिकारी यांचेकरीता व्यायामशाळा दि. ०५/०२/२०१९ रोजीपासुन सुरू करण्यात आली आहे. सदर व्यायामशाळेत अत्याधुनिक साहित्य असुन व्यायामशाळा सकाळी ०६.३० ते ०९.०० व सायंकाळी १६.०० ते २०.०० वा. पावेतो चालु असते. सदर व्यायामशाळेची मासिक फी खालीलप्रमाणे आहे.







| अ. क्र. | पोलीस अधिकारी | नवी मुंबई पोलीस आयुक्तालया बाहेरील पॉलीस अधिकारी याच्याकरिता मासिक फी | नवी मुंबई पोलीस आयुक्तालया बाहेरील पॉलीस अधिकारी यांच्याकरिता मासिक फी | सेवानिवृत्त पोलीस अधिकारी यांच्याकरिता मासिक फी |
|---|---|---|---|---|
| १ | पोउपनि व सपोनि | २०० | ४०० | २०० |
| २ | पोनी व सपोआ | ३०० | ६०० | ३०० |
| ३ | पोउपआ व त्यावरील दर्जाचे अधिकारी | ४०० | ८०० | ४०० |







**२५) पोलीस मुख्यालयातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांचेकरीता व्यायामशाळा**

नवी मुंबई पोलीस मुख्यालयात पोलीस अधिकारी व अंमलदार यांचेकरीता व्यायामशाळा सुरु करण्यात आली आहे. सदर व्यायामशाळेत अत्याधुनिक साहित्य असुन व्यायामशाळा सकाळी ०७.०० ते १०.०० व सायंकाळी १६.०० ते १९.०० वा. पावेतो चालु असते. सदर व्यायामशाळेची मासिक फी रु. १५०/- आहे.

**२६) पोलीस मुख्यालयातील पोलीस अधिकारी यांचेकरीता रेस्ट हाऊस**

नवी मुंबई पोलीस मुख्यालयात पोलीस अधिकारी यांचेकरीता रेस्ट हाऊस सुरू करण्यात आले आहे. सदर रेस्ट हाऊस मध्ये एकुण २ सुट व ४ रूम असुन त्याचे प्रति दिन रु.४००/- भाडे आहे.

**२७) समाधान हेल्पलाईन (PFC)**

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील प्रशासकीय कामकाजात प्रलंबित प्रकरणची शिघ्रतेने निर्गती, कामकाजात पारदर्शकता, पोलीस अधिकारी व अंमलदार यांच्या वेळेची बचत व्हावी याकरीता मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे आदेश कं. पोमस / २८ - ओ / ४९३७/क. वृं.प. ४८वी सभा-समाधान हेल्पपाईन / १४६/२०१६ दि. ०६/०९/२०१६ अन्वये नवी मुंबई पोलीस आयुक्तालयामध्ये दि. ०१/१०/२०१६ रोजी पासुन समाधान हेल्पलाईन हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील अधिकारी व अंमलदार यांची कामे, हक्क रजा,

वेतन निश्चीती, वेतनवाढ, वेतन पडताळणी, निवृत्ती वेतन तत्संबंधी देय लाभ, शिट रिमार्कस, बक्षिसे, कसुरी, घरभाडे, पदोन्नती, पदोन्नतीची सद्यस्थिती, वेलफेअर संबंधीचे सर्व कामकाज इत्यादीबाबत तक्रारींचे निवारण समाधान हेल्पलाईन मार्फत केले जाते. माहे जानेवारी २०२३ मध्ये तक्रारींचे स्वरूप पहाता मोबाईल क्रमांक ९१३७२७९१०३ हा व्हॉट्सअ‍ॅप नव्याने उपलब्ध करून देण्यात आला त्यामुळे पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे तक्रारी व अडी-अडचणी सोडविणे सोयीस्कर झाले आहे.



## २८) पाळणाघर

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे लहान मुलांकरीता पोलीस मुख्यालय, कळंबोली, नवी मुंबई येथे वातानुकूलीत पाळणाघर ( डे केअर सेंटर) सुरू करण्यात आले आहे. जेणेकरून त्यांना त्यांचे मुलांचे संगोपनाबाबत काळजी न करता आपले कर्तव्य व्यवस्थीत करता येईल. सदर पाळणाघरामध्ये लहान मुलांना खेळण्यासाठी अथवा मनोरंजनासाठी विविध प्रकारची खेळणी व साहित्य ठेवण्यात आलेले आहे. तसेच सदर ठिकाणी लहान मुलांची जेवण्याच्या सोईकरीता स्वच्छ स्वयंपाक गृहाची सोय आहे. तसेच स्वच्छतागृहाची देखील सोय आहे. लहान मुलांचे मनोरंजनासाठी टी. व्ही. ची सोय करण्यात आली आहे.



## २९) एम-पोलीस मधील सुविधा

m-POLICE (महाराष्ट्र पोलीस माहिती आणि विश्लेषण प्रणाली) हा नवी मुंबई पोलिसांच्या कार्यरत प्रकल्पापैकी एक आहे ही प्रणाली सर्व विभागीय प्रक्रिया स्वयंचलित करेल आणि अधिका-यांच्या सर्व स्तरांना पोलीस विभागाच्या प्रक्रियेचे पारदर्शक चित्र देईल.

एम पोलीस आय टी विभाग हे नेटवर्क, डेटा आणि एप्लिकेशन वर कार्य करते. हे पारंपारिक इफास्ट्रक्चर नेहमीच्या हार्डवेअर व सॉफ्टवेअर या घटकांनी बनलेले आहे. यामध्ये सुविधा, डेटा सेंटर, नेटवर्किंग, हार्डवेअर, डेस्कटॉप कॉम्प्युटर आणि एंटरप्राइझ ॲप्लीकेशन सॉफ्टवेअर सोल्युशन, आयटी सेल सोयीस्कर पायाभुत सुविधा विश्वासार्ह आणि सुरक्षित असेल तर ती एखादया एंटरप्राईझला त्याची उद्दीष्टे पुर्ण करण्यात आणि बाजारपेठेत स्पर्धात्मकता प्रदान करण्यात मदत करू शकते. वैकल्पीकरित्या जर आयटी पायाभुत सुविधा योग्यरित्या अंमलात आणल्या गेल्या नाहीत तर व्यवसायांना कनेक्टिव्हिटी उत्पादकता आणि सिस्टम व्यत्यय आणि उल्लंघनासारख्या सुरक्षा समस्यांचा सामना करू शकतो.

M POLICE
महाराष्ट्र पोलीस

नवीन प्रणाली सर्व विभागीय प्रक्रिया जसे की सामील होणे, बदली, पुरस्कार, कर्तव्य वाटप, प्रशिक्षण, रजा इ. स्वयंचलित करेल. सर्व अंतिम वापरकर्त्यांना म्हणजे मोबाईल वापरकर्त्यांना सर्व इव्हेन्ट आरंभिकरणांवर सुचित केले जाईल. सर्वात महत्वाचे म्हणजे प्रत्येक कर्मचा-यांचे सर्व्हिस बुक ऑनलाईन व्यवस्थापित केले जाईल, ज्यामुळे जोखीम हाताळणे टाळता येईल. कार्यक्षमतेचे प्रवेश अधिकारी जसे की भिन्न अहवाल प्रक्रिया, हस्तांतरणाची यादी, पुरस्कार सिस्टममधुन व्यावस्थापित करण्यास सक्षम असावे. ही यंत्रणा महाराष्ट्र पोलीस विभागासाठी तयार करण्यात आली आहे. नविन प्रणाली सर्व विभागीय प्रक्रिया स्वयंचलित करेल जसे की जॉइनिंग, ट्रान्सफर, अॅवार्ड, डयुटी ऍलोकेशन, ट्रेनिंग रजा इ. कर्मचा-यांसाठी स्वतंत्र मोबाईल अॅप्लिकेशन आहे. हे वेब आधारीत एप्लिकेशन तसेच मोबाईल एप्लिकेशन आहे.

**सेवा पत्र:**

या मोडयुलमध्ये पोलीस कर्मचा-यांची सेवापत्रक संपादित, अपडेट करू शकतो. तसेच सेवार्थ क्रमांक वापरून प्रविष्ठ केलेला डेटा आपण पाहु शकतो. आणि डिजिटल सर्व्हिसबुक मध्ये प्रत्यक्ष प्रवेश आहे. यामध्ये युजरची नविन माहिती अपडेट करण्याचा पर्याय आहे. वापरकर्ता हे त्याच्या किंवा तीच्या मोबाईल अॅपमध्ये तसेच वेबलॉगीनवर देखील पाहु व वापरू शकतो. कर्मचा-यांना त्यांच्या सेवा तपशिल जाणुन घेण्यासाठी सेवांची डिजिटल प्रत उपलब्ध आहे. सेवापुस्तकाचे रिअल टाईम अपडेट पारदर्शक आणि कर्मचारी केंद्रित प्रक्रिया सुनिश्चित करेल.

**रजा**

यामध्ये कर्मचारी रजेचा अर्ज ऑनलाईन करू शकतात. ज्या कर्मचा-याने रजेसाठी अर्ज केला आहे त्याने /तीने या मोडयुलचा वापर करून दुस-या कर्मचा-याला त्यांचा कार्यभार सोपवावा लागेल. यामध्ये तो/ती त्याच्या मोबाईल अॅपचा वापर करून कुठुनही रजेचा अर्ज करू शकतो आणि पोलिस निरिक्षक त्या अर्जावर नाकारणे /मंजुरी असा रिमार्क देवु शकतात. पोलीस दलाच्या सर्व श्रेणींमध्ये रजा सुविधेची जलद आणि पारदर्शक हालचाल सुनिश्चित करण्यासाठी हे मोडयुल वापरले जाते. कर्मचारी एका बटणाचे क्लिकवर त्यांच्या पोस्टींग स्थानांना भेट न देता रजेचा लाभ घेवु शकतात अहवाल अधिकारी थेट रजा मंजुर करू शकतात.

**समाधान**

समाधान हे वापरकर्त्याच्या समस्येचे निराकरण करण्यासाठी आहे. सेवापत्रक पगार स्लिप इ. बाबत समस्या मांडण्यासाठी हे हेल्पलाईन आहे. वापरकर्ते तक्रार करू शकतात. यामध्ये ते तिकीट ही तयार करू शकतात. याप्रक्रियेचा पारदर्शक प्रवाह आहे. आणि जलद व त्वरित प्रतिसाद मिळतो. कर्मचा-यांसाठी पीएफसी त्यांना विविध सुविधा समस्या / प्रश्नांसाठी त्यांची विनंती अर्ज करण्यास / सबमीट करण्यास मदत करेल. ऑनलाईन प्रतिसाद अर्ज करण्यासाठी आणि वैयक्तीक रित्या स्पष्टीकरण मिळण्यासाठी मनुष्यांच्या तासांचा अपव्यय टळेल. पारदर्शकता आणि जलद प्रक्रियेमुळे तक्रारींची संख्या कालांतराने कमी होईल. कर्मचारी मोबाईल अॅपचे वैशिष्ट्यावरून हि सुविधा मिळवु शकतात.

**प्रशासक मास्टर**

कर्मचारी मास्टर येथे कर्मचारी शोधु शकतो. सेवार्थ, बक्कल नंबर, नाव जिपीएफ नंबर, मोबाईल नंबर याद्वारे कर्मचा-यांना शोधण्यासाठी प्रशासन हा पर्याय वापरू शकतो. प्रशासक त्यांच्या युनिटमधील कर्मचा-यांचा शोध घेवु शकतो. प्रशासन कर्मचा-यांचे सर्व्हिसबुक पाहु शकतो. प्रशासक कर्मचारी तपशिल कधीही अपडेट शकतो. बक्षिसे - बक्षीस प्रक्रिया पोनि / सपोनि दवारे सुरू केलेल्या संबंधीत युनिट / उपयुनिट साठी आहे. कर्मचा-यांच्या वर्तमान आणि मागील कामगिरीचे / कर्मचा-यांच्या विषे

कामगिरीच्या मुल्यांकनावर आधारित पुरस्कारांची शिफारस आणि मंजुरी हि प्रक्रिया कर्मचा-यांना कामगिरीसाठी प्रेरित करण्यास मदत करते. सेवार्थ आयडी बक्कल नंबर किंवा जीपीएफ नंबर दवारे प्रशासक कर्मचारी शोधु शकतो. निवडलेल्या कर्मचा-याला कोणतेही बक्षिस मिळाले असल्यास सुचीमध्ये प्रदर्शित केले जाईल.

**दैनिक बुलेटिन**

हे दैनिक वृत्तपत्र वाचण्यासाठी आहे. न्युज पेपर कटिंग जोडा - न्युजपेपर कटिंग प्रोफाईल जोडण्याचा अधिकार असलेले कर्मचारी न्युजपेपर कटिंग अपलोड करू शकतात. आणि ते सर्वांना दिसेल प्राधीकरण डेली बुलेटिन न्युज पेपर कटिंग जोडा या कार्यक्षमतेमध्ये प्रवेश करू शकतात. नविन पेपर कटिंग जोडण्यासाठी पेपर कटिंग तयार करणे वर क्लिक करा. प्राधीकरणाने पेपर कटिंगचे शिर्षक, पेपर कटिंगचा स्त्रोत, तारीख जोडणे आवश्यक आहे. आणि इमेजमध्ये पेपर कटिंग संलग्न करणे आणि ते सबमिट करणे आवश्यक आहे. भरलेल्या तपशिलांसह फॉर्म सबमिट केल्यानंतर, पेपर कटिंग अपलोड केले जाईल आणि ते सर्वांना प्रदर्शित केले जाईल जोडलेले वर्तमान पत्र कटिंग दैनिक बुलेटिन - न्युजपेपर कटिंगमध्ये प्रदर्शित केले जाईल. वृत्तपत्र कटिंग - सर्व कर्मचारी अपलोड केलेले पेपर कटिंग पाहु शकतात.

**डेली बुलेटीन**

न्युजपेपर कटिंगवरून या कार्यक्षमतेमध्ये प्रवेष करू शकतो. अपलोड केलेल्या कटिंगच्या दृश्यात कर्मचारी हेडलाईन, प्रतिमा, कटिंग अपलोडर तपशिल आणि कटिंगची तारिख आणि वेळ पाहु षकता.

**प्रशिक्षण (कौशल्य)**

सर्व मॉडयुलचे कार्य समजुन घेण्यासाठी प्रशिक्षण आवश्यक आहे कि प्रशिक्षण प्रशिक्षकाद्वारे दिले जाईल. यामध्ये वापरकर्ता अर्जाची यादी तयार करू शकतो. उपस्थिती भरू शकतो. प्रशिक्षणसाठी अर्ज करू शकतो तसेच प्रशिक्षणाचे वेळापत्रक बनवु शकतो.

**पगार स्लिप**

महिना आणि वर्षावर क्लिक करा मग कर्मचा-यांची महिन्यानुसार पगार स्लिप मिळेल.

Emergency – 102/ 7738363836  Traffic Helpline – 7738393839 Costal Helpline – 1093
Woman Helpline – 103
Whatsapp Number – 8424820665 Senior Citizen Helpline - 1090